CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ मुंबई, गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

# गोल्फ कोर्सची हिरवळ...



**नवी मुंबई :** सिडकोने १०९ कोटी खर्च करून खारघर येथे १८ होलचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे गोल्फ कोर्स विकसित केले आहे. सध्या या कोर्सचे काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच ते खेळाडूंसाठी खुले करण्यात येणार आहे. (सत्यवान वास्कर : सकाळ छायाचित्र सेवा)

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

Thursday, 1 August 2024 **Newsband**

# Andhra Pradesh Minister Dr. P. Narayan visits CIDCO project sites to study urban development model

By Chandrashekhar Hendve

**Navi Mumbai:** On July 31, 2024, Dr. P. Narayan, the Hon'ble Minister of Municipal Administration and Urban Development of Andhra Pradesh, visited various project sites managed by the City and Industrial Development Corporation (CIDCO). The visit aimed to study CIDCO's urban development model as Andhra Pradesh prepares to develop its new capital city in Amravati.




Following the site visits, a presentation was held at CIDCO Bhavan, where Dr. Narayan and his delegation were briefed on CIDCO's urban development practices. Key officials present at the presentation included Shri Vijay Singhal, Vice-Chairman and Managing Director of CIDCO; Shri Shantanu Goel, Joint Managing Director; Shri Suresh Mengde, Chief Vigilance Officer; and several other senior CIDCO officers.

The Andhra Pradesh government plans to develop a futuristic capital city in Amravati, spanning 217 square kilometres. The project includes comprehensive infrastructure such as city roads, water supply and sewerage systems, transportation networks, and essential amenities. The city will feature iconic buildings like the Secretariat, Legislative Assembly, High Court, and government housing facilities to create a modern and sustainable urban hub.

दैनिक किल्ले रायगड दिनांक : ०१-०८-२०२४

# आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन व नगर विकास मंत्री डॉ. पी नारायण गारू यांनी सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना दिली भेट

**नवी मुंबई दि. ३१ (प्रतिनिधी) : आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन आणि नगर विकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी बुधवार, दि. ३१ जुलै २०२४ रोजी सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना भेट दिली. प्रकल्प स्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.**



या प्रसंगी श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, श्री. कटानेनी भास्कर, आयुक्त, एपीसीआरडीए, श्री. एम. नवीन, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, श्री. प्रवीण चंद, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, श्री. रवींद्र मानकर, मुख्य नियोजनकार, सिडको, श्री. एन. सी. बायस, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, श्री. प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य अभियंता, सिडको, श्री. आशितोष निखाडे, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आणि श्रीमती प्रांजली माने, वरिष्ठ नियोजनकार, सिडको यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आंध्र प्रदेश शासनातर्फे आंध्र मधील अमरावतीत येथील २१७ चौ.कि.मी. क्षेत्रावर राजधानीचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधीमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे.

या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट प्रथा, पद्धती आणि आर्थिक प्रारुपांचा अभ्यास करण्याकरिता सिडकोच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने आजच्या भेटीचे नियोजन सिडकोतर्फे करण्यात आले होते.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

पुण्य नगरी गुरुवार, १ ऑगस्ट २०२४ | मुंबई

# आंध्र प्रदेश मंत्र्यांची सिडको प्रकल्पांना भेट




**बेलापूर :** आंध्र प्रदेशचे नगरपालिका प्रशासन व नगरविकास मंत्री डॉ. पी. नारायण गारू यांनी बुधवारी सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना भेट दिली. आंध्र प्रदेशची नियोजित राजधानी अमरावतीच्या विकासाकरिता नवी मुंबईतील प्रकल्पस्थळांना त्यांनी भेट दिली. त्यानंतर आंध्र प्रदेशच्या शिष्टमंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरणदेखील करण्यात आले.

आंध्र प्रदेश शासनाच्या वतीने आंध्रमधील अमरावती येथील २१७ चौरस किमी क्षेत्रावर राजधानीचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधिमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत.

या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे. या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा सिडकोला दीर्घ अनुभव आहे. त्यामुळे सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट प्रथा, पद्धती आणि आर्थिक प्रारुपांचा अभ्यास करण्याकरिता त्यांच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने नगरविकास मंत्री डॉ. पी. नारायण गारू हे सिडकोमध्ये आले होते. या प्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, आयुक्त, एपीसीआरडीए कटानेनी भास्कर, अतिरिक्त आयुक्त एम. नवीन, अतिरिक्त आयुक्त प्रवीण चंद, रवींद्र मानकर, एन. सी. बायस, प्रभाकर फुलारी, आशितोष निखाडे आणि वरिष्ठ नियोजनकार प्रांजली माने आदी उपस्थित होते.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत मुंबई, गुरुवार, दि. १ ऑगस्ट २०२४

# नवी मुंबईच्या धर्तीवर विकासाचा निर्णय

## आंध्रच्या मंत्र्यांकडून सिडकोच्या विविध प्रकल्पांची पाहणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** आंध्र प्रदेशची नियोजित राजधानी अमरावतीचा नवी मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याचा निर्णय आंध्र प्रदेश सरकारने घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून आंध्र प्रदेशचे नगरपालिका प्रशासन व नगर विकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी बुधवारी सीबीडी येथील सिडको भवनला भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडकोच्या माध्यमातून उभारलेल्या व प्रगतिपथावर असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी केली. याप्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व अधिकारी उपस्थित होते.



आंध्र प्रदेशचे नगरविकासमंत्री डॉ. गारू यांनी सिडको भवनला भेट दिली.

### २७४ चौरस किमी क्षेत्रावर शहर विकसित करणार

आंध्रमधील अमरावती शहराच्या २१७ चौरस किमी क्षेत्रावर राजधानीचे शहर विकसित करण्यात येणार आहे. या अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण आदी पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधिमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्याची योजना आहे.

**लोकदृष्टी** गुरुवार दि. १ ऑगस्ट - २०२४

# आंध्रप्रदेश नगरविकास मंत्र्याची सिडकोच्या विविध प्रकल्प स्थळांना भेट

बेलापूर (प्रतिनिधी) - आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन व नगर विकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी आंध्र प्रदेशची नियोजित राजधानी अमरावतीच्या विकासाकरिता, सिडकोच्या विविध प्रकल्प स्थळांना काल भेट दिली.

या प्रकल्प स्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रसंगी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्यासह शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, कटानेनी भास्कर, आयुक्त, एपीसीआरडीए, एम. नवीन, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, प्रवीण चंद, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, रवींद्र मानकर, मुख्य नियोजनकार, सिडको, एन. सी. बायस, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य अभियंता, सिडको, आशितोष निखाडे, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आणि प्रांजली माने, वरिष्ठ नियोजनकार, सिडको यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. (उर्वरित पान ३ वर)



CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

रायगड नगरी — गुरुवार दि.१ ऑगस्ट २०२४

### आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन व नगर विकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी

# सिडकोच्या विविध प्रकल्प स्थळांना दिली भेट

दै.रायगड नगरी । पनवेल

आंध्र प्रदेशचे मा. नगरपालिका प्रशासन आणि नगर विकास मंत्री, डॉ. पी नारायण गारू यांनी बुधवार, दि. ३१ जुलै २०२४ रोजी सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना भेट दिली.

प्रकल्प स्थळांना भेट दिल्यानंतर सिडको भवन येथे आंध्र प्रदेशच्या शिष्ट मंडळातील सदस्यांकरिता सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रसंगी विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको, कटानेनी भास्कर, आयुक्त, एपीसीआरडीए, एम. नवीन, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, प्रवीण चंद, अतिरिक्त आयुक्त, एपीआरसीडीए, रवींद्र मानकर, मुख्य नियोजनकार, सिडको, एन. सी. बायस, मुख्य अभियंता (नवी मुंबई), सिडको, प्रभाकर फुलारी, अतिरिक्त मुख्य अभियंता, सिडको, आशितोष निखाडे, अतिरिक्त मुख्य नियोजनकार आणि श्रीमती प्रांजली माने, वरिष्ठ नियोजनकार, सिडको यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



आंध्र प्रदेश शासनातर्फे आंध्र मधील अमरावीत येथील २१७ चौ.कि.मी. क्षेत्रावर राजधानीचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, मलनिस्सारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधीमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे.

या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण स्वयंपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट प्रथा, पद्धती आणि आर्थिक प्रारुपांचा अभ्यास करण्याकरिता सिडकोच्या विविध विकास प्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने आजच्या भेटीचे नियोजन सिडकोतर्फे करण्यात आले होते.




महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

# आंध्रच्या राजधानीसाठी सिडकोचा आदर्श

**म. टा. वृत्तसेवा,** नवी मुंबई

आंध्र प्रदेशचे नगरपालिका प्रशासन आणि नगरविकास मंत्री डॉ. पी. नारायण गारू यांनी बुधवारी सिडकोच्या विविध प्रकल्पस्थळांना भेट दिली. त्यानंतर आंध्र प्रदेशच्या शिष्टमंडळातील सदस्यांसाठी सिडकोच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.

आंध्र प्रदेश सरकारतर्फे आंध्रमधील अमरावीत येथील २१७ चौ. किमी. क्षेत्रावर राजधानीचे शहर विकसित करणे नियोजित आहे. या प्रकल्पांतर्गत शहरांतर्गत रस्ते, पाणीपुरवठा, मलनिःसारण व्यवस्था, दळणवळण इ. पायाभूत सुविधांसह सचिवालय, विधीमंडळ, उच्च न्यायालयाच्या इमारती विकसित करण्यात येणार आहेत. या सुविधांसह शासकीय गृहनिर्मितीही नियोजित आहे. या संदर्भात भौतिक व सामाजिक पायाभूत सुविधांनी परिपूर्ण शहरे विकसित करण्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या सिडकोच्या नगर नियोजनातील उत्कृष्ट पद्धती आणि आर्थिक प्रारूपांचा अभ्यास करण्यासाठी सिडकोच्या विविध विकासप्रकल्पांना भेट देण्याच्या अनुषंगाने या भेटीचे नियोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल आदी उपस्थित होते.




★ मुंबई, गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

**लोकसत्ता**

WWW.LOKSATTA.COM

# नवी मुंबईच्या धर्तीवर आंध्रच्या राजधानीची उभारणी

## आंध्र प्रदेशच्या नगरविकासमंत्र्यांची सिडकोच्या अधिकाऱ्यांशी चर्चा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पनवेल :** आंध्र प्रदेश सरकार त्यांचे अमरावती हे राजधानीचे हरित शहर वसविण्यापूर्वी सिडको मंडळाने उभारलेल्या नवी मुंबई व परिसराच्या पायाभूत सुविधांचा अभ्यास करत आहे. बुधवारी आंध्र प्रदेशचे नगरपालिका प्रशासन आणि नगर विकासमंत्री डॉ. पी नारायण यांच्यासह आंध्र प्रदेश राजधानी क्षेत्र विकास प्राधिकरणातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी नवी मुंबईतील सिडको महामंडळाच्या विविध प्रकल्पांना भेट दिली.

सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल यांच्यासह अधिकाऱ्यांनी विविध प्रकल्पाच्या सादरीकरणातून माहिती आंध्र प्रदेशच्या अधिकाऱ्यांना दिली.

आंध्र प्रदेश सरकार आंध्र (अमरावती) येथील २१७ चौ.किलोमीटर क्षेत्रावर हरित राजाधीनचे शहर विकसित करत आहे. २०५० पर्यंत या हरित शहराची लोकसंख्या ३५ लाख गृहीत धरून नियोजन केले जात आहे. यात पिण्याचे पाणी, रस्ते, दळणवळण, मलनिस्सारण योजना, पावसाळी गटार यांसारख्या पायाभूत सुविधांसह सरकारी कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान, सरकारी संकुल तसेच १५७५ एकर क्षेत्रावर सचिवालय, विधिमंडळ आणि उच्च न्यायालयाची इमारत बांधण्याचे नियोजन आंध्र सरकारने केले आहे. सरकारच्यावतीने गृहनिर्माण व इमारत सुविधांसह शहराच्या औद्योगिक, व्यावसायिक आणि सामाजिक व सांस्कृतिक गरजा ज्याप्रमाणे सिडको मंडळाने नवी मुंबईत केल्या आहेत. त्याच धर्तीवर आंध्र प्रदेश सरकार उभारेल यासाठी हा दोन दिवसांचा अभ्यास दौरा आखला आहे.